# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

**(सामान्य प्रशासन शाखा)**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५२२९९१ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


## अधिसूचना

क्रमांक: रातुमनावि/साप्र/२०१७/१४ — दिनांक: १६.नोव्हेंबर २०१७

## नोंदणीकृत पदवीधरांची पुरवणी सूची प्रसिध्द करण्याविषयी

या अधिसूचनेद्वारा संबंधित सर्व पदवीधरांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठाद्वारे प्रकाशित करण्यात आलेल्या अधिसूचना क्रमांक रातुमनावि/साप्र/२०१७/११, दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ नुसार नोंदणीकृत पदवीधरांची सूची प्रसिध्द करण्यात आली होती. सदर यादीवर प्राप्त झालेल्या आक्षेपांबाबत मा. कुलगुरूंनी घेतलेला निर्णय परिपत्रक क्रमांक रातुमनावि/साप्र/२०१७/स/२५९५, दिनांक १३ नोव्हेंबर २०१७ रोजी विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.org** संकेत स्थळावरील **Election - 2017** या **Portal** वर प्रसिध्द करण्यात आला आहे. मा. कुलगुरूंनी घेतलेल्या निर्णयाला अनुसरून दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या नोंदणीकृत पदवीधरांची सूंची प्रसिध्द करण्याविषयीची अधिसूचना क्रमांक रातुमनावि/साप्र/२०१७/११ ला जोडून या अधिसूचनेनुसार आता **नोंदणीकृत पदवीधरांची पुरवणी नोंदवही** विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.org** संकेत स्थळावरील **Election - 2017** या **Portal** वर प्रसिध्द करण्यात आली आहे, याबाबत कृपया सर्व संबंधीत नोंदणीकृत पदवीधरांनी नोंद घ्यावी.

नोंदणीकृत पदवीधरांनी सूचीतील **नोंदणीक्रमांची नोंद** आपल्याजवळ ठेवावी. कारण नोंदणी क्रमांक नोंदणीकृत पदवीधर गटाच्या मतदार यादीत संबंधितांचे नाव समाविष्ट करण्याकरिता सादर करावयाच्या **FORM-B** मध्ये नमूद करणे अनिवार्य आहे.

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये

(पुरणचंद्र मेश्राम)

कुलसचिव